ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | JUNE - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्रि शिक्षण

डॉ.वाय. एस.माहुरे
शि.प्र.मं.विज्ञान व गिलाणी कला,वाणिज्य महाविद्यालय,घाटंजी

## प्रस्तावणाः-



स्त्रियांना शैक्षणिक स्वतंत्र्य देण्यात येवूच नये ही प्राचिन मनोवृत्ती महात्मा ज्योतीबा फुल्यांनी त्याज्य ठरवित भारतात मुलीच्या शिक्षणाला सुरवात केली व तत्कालीन परिस्थितीत पुण्यासारख्या नगरात इ.स. १८४८ मध्ये मुलीकरीता शाळा उघडली व सनातन्या विरूध्द एक प्रकारचा आवाज उठविला. अर्थात संस्कृतीच्या जडणघडणीत पुरूष प्रधान संस्कृतीचे वर्चस्व असतांना स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा देण्याची कल्पनाच मुळी पुरूषांना सहन होण्यासारखी नव्हती. वैदीककाळ वगळता प्राचिन काळात स्त्रीयांचा केवळ उपयोगी वस्तु म्हणुनच तीचा वापर केला जात होता. भारतीय कुटुंबव्यवस्थेत पुरूष व स्त्रियांच्या कामाची वाटणी ठरलेली असल्यामुळे मुलींना शिक्षण देण्याकडे पुरूष वर्गाकडुन जबर विरोध होत होता.परंतु भारतात ब्रिटीशांच्या आगमणाने इंग्रजी शिक्षणाला सुरूवात झाल्याने ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या गेल्या तेव्हा भारतातील तत्वचिंतकांना भारतीय सामाजिक व्यवस्थेतील सामाजिक प्रमाद निदर्शनास येवू लागले.महात्मा फुलेंनी सनातन व्यवस्थेविरूध्द बंड पुकारीत मुलींना शिक्षणांची संधी उपलब्ध करून दिली त्यातुनच भारतात स्त्रि शिक्षणाच्या आवश्यकतेची जाणिव निर्माण होवू लागली. स्त्रियांना शिक्षण देण्याची महात्मा फुलेच्या चळवळीनंतर सामाजिक सुधारणावादी सुधारक महर्षी कर्वे, वि.रा.शिंदे, डॉ. आंबेडकर इत्यादींनी चळवळी जीवंत ठेवल्या परंतु अनेक शाळा,महाविद्यालय, विद्यापीठ यातुन शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण अत्यल्पच होते. त्यातच स्पृश्य आणि अस्पृश्य मुलींना प्रवेशच मिळत नसे. या पार्श्वभुमिवर स्पृश्य, अस्पृश्य व इतरही मुलीना शिक्षण मिळावे यासाठी महात्मा फुले नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार सामाजिक परिवर्तनाला अधिक बळकटी देणारा दिसुन येतो. त्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्त्रि शिक्षण विषयक ध्येय धारेणाचे वर्णन करणे क्रमप्राप्त ठरते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर व स्त्रि शिक्षणः-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर औरंगाबाद येथील मिलींद महाविद्यालयाच्या कोणशिला समारंभात शिक्षणसंदर्भांत आपले धोरण स्पष्ट करतांना म्हणतात, शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे साधन असुन शिक्षण हे सामाजिक दुखण्यावरील औषध होय [१] असे ते मानतात. निरोगी समाज शिक्षणाने उन्नती करू शकतो. परंतु शिक्षणापासुन वंचीत असलेला समाज रोगीट बनतो इथे तर स्त्री शिक्षणापासुन वंचीत आहे. त्यामुळे समाजाची उन्नती होणे अशक्य प्राय आहे.

तामीळनाडुमधील बहुजन समाजाचे अग्रगण्य नेते इ.व्ही.पेरीयर रामास्वामी पोल्लुर येथील शिक्षकांच्या अधिवेशनात म्हणाले होते की, भारतात सहा-सात वर्षापर्यंतचे शिक्षण पाल्यांना आपल्या स्त्री वर्गाकडुन दिले जाते परंतु त्या स्वतःच अशिक्षीत असल्यामुळे त्यांना ते कसे शक्य होईल.[२] स्वातंत्र्यानंतर

शिक्षणाची ही अवस्था होती. यावरून स्त्रि शिक्षण किती महत्वाचे होते हे लक्षात येते म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांना पुर्वप्राथमिक अवस्थेतच शिक्षण मिळाले पाहीजे असे वाटत होते, म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सक्तीचे शिक्षण भारतात अनिवार्य वाटत होते. आपल्या बहिष्कृत भारत यातील अग्रलेखात सक्तीच्या शिक्षणाचे राष्ट्रीय महत्व ते पटवून देतात ते म्हणतात प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वागीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे, केवळ लोकांच्या खुशिवर हा प्रश्न सोपविण्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणुन प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीपत सक्तीचा कायदा करावा लागतो. आघाडीस आलेल्या सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली. असे आपणास दिसुन येईल जे वर्ग आधीच शिक्षणाचा लाभ घेतात त्यांच्यावर शिक्षणासाठी अर्थातच सक्ती करावी लागत नाही.परंतु ज्यांना शिक्षणाचे महत्वच कळत नाही व जे शिक्षणाच्या बाबतीत उदासीन असतात त्यांच्या करीता मात्र सक्तीच्या कायद्याची आवश्यकता असते.[३] या बाबासाहेबांच्या अग्रलेखातुनच त्यांच्या स्त्रि शिक्षणाबाबतची तळमळ लक्षात येते.

केवळ मुलांना शिक्षण दिल्याने आपण एकच व्यक्ती शिक्षीत करीत असतो या उलट मुलींना शिक्षण दिल्यास आपण संपुर्ण कुटुंब शिक्षित करीत असतो. कारण बालपणीची सहावर्ष पर्यतचे शिक्षण हे घरातील स्त्रीच देत असते ही मौलीक विचारसरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. सामाजिक स्थिती व समाजमन हळुहळू बदलत असते तरी मुलींच्या शिक्षणाची प्रगती मुलांच्या शिक्षणाच्या प्रगतीच्या तुलनेत कमीच आहे हे स्पष्टपणे दिसुन येते. वास्तविक पाहता भारतीय संविधानाच्या कलम १६ (अ) नुसार स्त्री–पुरूष भेदावरील सामाजिक व्यवस्था ही अनैसर्गीक असुन ती स्त्री जातीवर अन्याय करणारी असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणुन स्त्रियांना बरोबरीचा दर्जा देणे म्हणजे सामाजिक न्यायाची बुज राखणे होय हे ही स्पष्ट केले आहे. कारण बाबासाहेबांना याची जाणीव होती की, कोणताही समाज किंवा सामाजिक व्यवस्था स्त्री– पुरूषाच्या सहजीवनाशिवाय अस्तीत्वात येवू शकत नाही. तेव्हा स्त्रियांना मागे ठेवता येणार नाही त्यांना शिक्षीत करणे गरजेचे ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांना समाज घटकांतील अतिशय महत्वाचे तत्व मानतात आणि स्त्रियांमुळे सामाजिक विकास होतो असे मानतात. जर स्त्री शिवाय समाजाला अस्तीत्वच नाही तर स्त्री वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहणे योग्य नाही. बाबासाहेबांच्या मते, स्त्री म्हणजे आपली संस्कृती होय. म्हणुन ती सतत विकसीत ठेवणे अनिवार्य आहे कारण त्याशिवाय समाज प्रगतीशिल राहणार नाही. मुलामुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत नागपुर येथील अखिल भारतीय दलीत महीला परिषदेला संबोधीत करतांना म्हणतात की, ''समाजात ज्या प्रमाणात स्त्रियांची प्रगती झाली असेल त्यावरून मी एखादया समाजाची प्रगती मापत असतो, महीलांना सांगतात की, तुमच्या मुलांना शिक्षण दया, हळुहळू त्यांच्या मनात महत्वाकांक्षा जागृत करा ते थोर पुरूष होणार आहेत असे त्यांच्या मनावर बिंबवा त्यांच्यातील हिनगंड नाहीसा करा''[४] परंतु हे केव्हा होईल जेव्हा स्त्री शिक्षीत होईल. यावरून बाबासाहेबाची स्त्रियांच्या जागृकते विषयीची तळमळ दिसुन येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुला–मुलींना एकत्र शिक्षण घेतले पाहीजे असे वाटत होते. मुला मुलींसाठी वेगवेगळया शाळा, महाविद्यालय काढणे त्यांना अपेक्षित नव्हते. मुली समाजाभिमुख झाल्या पाहीजे तसेच सामाजिक वातावरणात मिसळल्या पाहीजे म्हणुनच त्यांनी औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली ज्या महाविद्यालयातुन मुला मुलींना एकत्रीतपणे शिक्षण घेता येईल मुली सहशिक्षणासाठी तयार राहतील या उद्देशाने तशी व्यवस्थाही केली. मिलींद महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभ प्रसंगी ते उत्कटतेने म्हणतात की,''नमुद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या महाविद्यालयात मुलांच्या बरोबरीने मुलीही शिक्षण घेत आहे. सामाजिक मागासलेपण आणि सहशिक्षणाचा गंध नसलेल्या या भागात मुलांच्या बरोबरीने मुलींना शिक्षण देवून हे कॉलेज एक नविनच पायंडा घालीत आहे. या कॉलेजमध्ये सर्व जातीच्या व सर्व धर्माच्या मुली शिक्षण घेत आहेत. मुलींच्या शिक्षणाला उत्तेजन मिळावे व मोठया संख्येने मुलीनी महाविद्यालयात प्रवेश घ्यावा म्हणुन शहरापासुन कॉलेजपर्यंत येण्याकरीता महाविद्यालयाने बसची व्यवस्था सुध्दा केलेली आहे.[५]

स्त्री शिक्षणाविषयीची तळमळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विद्यार्थी दशेपासुनच भेडसावत होती. बडोदा संस्थानचे स्कॉलर म्हणुन बाबासाहेब अमेरीकेतील न्युयार्क शहरातील कोलंबीया युनिव्हर्सीटीत उच्च शिक्षणासाठी गेले असता तेथुन त्यांनी आपल्या वडिलाचे मित्र सुभेदारास ते पत्राव्दारे कळवितात की,जमेदार तुमच्या अंगी सुधारणेचे जे तेज आहे तसे अनेकांच्या अंगी असावे अशी माझी खुप इच्छा आहे तसेच आपण मुलाबरोबर मुलीनाही शिक्षण दयावे तुमच्या मुलींच्या शिक्षणावरून याची खात्री होईल तेव्हा तुम्ही शिक्षणाचे प्रचारकार्य करावे. निदान तुमच्या नजिकच्या गणगोत्रांना, अगर तुमच्या सानिध्यात येणाऱ्यामध्ये तरी तुम्ही शिक्षण प्रसार व शिक्षण प्रचार करावा.[६] यावरून डॉ. बाबासाहेबाच्या विचारात समाज कल्याणाच्या ध्येयाचे बीजारोपण त्यांच्या विद्यार्थी दशेपासुन झाले होते आपल्या मुलीप्रमाणे इतर ही मुलींना शिक्षीत करावे असा आग्रह ते जमेदारापुढे धरतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना हिंदु स्त्रियाबाबत प्रचंड कळवळा होता ते सहन करीत असलेल्या सामाजिक दर्जाबाबत प्रचंड विवंचना वाटत होती कारण हिंदु स्त्रियांना फक्त कर्तव्यच होती अधिकाराबाबत मात्र त्यांना एक अक्षरही काढता येत नसे. आणि असं अधिकार प्राप्त करण्यासाठी संघर्ष करावा लागतो आणि संघर्षाकरीता प्रथम त्याची जाणीव व्हावी लागते आणि ही जाणीव मात्र शिक्षणामुळे प्राप्त होते या संदर्भात बाबासाहेब बहिष्कृत भारत यातील अग्रलेखात म्हणतात, की ज्यांनी हक्क बळकाविलेत आहेत त्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला भिक मागुन किंवा अर्ज विनंत्या करून ते परत मिळणार नाहीत तर त्यासाठी सतत संघर्ष करावा लागेल. सिंह नव्हे तर बकरेच बळी दिले जातात.[७] तेव्हा स्त्रियांना शिक्षण देणे क्रमप्राप्त होते.

थोडक्यात स्त्रियांच्या सामाजिक दर्जात सुधारणा करण्याचा एकमेव प्रमुख मार्ग म्हणजे स्त्री शिक्षण होय. स्त्रियांना सक्षम शिक्षण दिल्याने त्यांच्यात जाणीव, जागृती निर्माण होईल तसेच नोकरी व व्यवसायात स्त्रीया प्रत्यक्ष भाग घेतील तसेच देशाच्या अर्थकारणात महत्वाची भुमीका बजावतील. त्यांच्यात घर करून बसलेली हिनत्वाची भावना शिक्षणामुळे व अर्थाजनामुळे नाहीसी होईल. खरोखरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रिशिक्षण विषयक दृष्टीकोन तमाम भारततील नव्हे तर जगातील स्त्री वर्गाला उत्तेजक व प्रेरणादायी ठरला यात शंका नाही.

### संदर्भ ग्रंथसुचीः-

१.आंबेडकर भि.रा.,जनता, १६ सप्टेंबर १९५१/गांजरे मा.फ.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-६,नागपुर १९८२
२.Periyar Ramaswami E.V., Reform of Education, Madras १९८३
३.बहिष्कृत भारत, ३१ मे १९२९
४. गांजरे मा.फ. खंड-१ पृ.क्र.५९
५.आंबेडकर भि.रा., जनता, १६/९/१९५१
६.कांबळे बी.सी. समग्र आंबेडकर चरित्र खंड-१ सुगावा प्रकाशण पुणे-१९८४ पृ.क्र.५०-५१
७. आंबेडकर भि.रा.,बहिष्कृत भारत,२९/०७/१९२७